**।। ॐ श्री परमात्मने नमः ।।**

# ।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

## श्रीमद्‌भगवद्‌गीता – शब्द श्लोक सूची

संकल्पना

**श्री. आदेश वसंत अत्रे**

संकलन

**सौ. पुष्पा अरुण जोशी**

**सौ. सुषमा प्रकाश समुद्र**

अद्वैत पब्लिकेशन्स्
बिल्डींग नं. ८, फ्लॅट नं. ६, आनंद पार्क सोसायटी, शंकरशेट रस्ता, पुणे ४११ ०३७.
दूरध्वनी : ०२०–२६४५७९६६ – **www.advaitgroup.com - publications@advaitgroup.com**
अधिक माहितीसाठी संपर्क: श्री. आदेश वसंत अत्रे – ९९२१३४५९५५

# ।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

**।। स्वस्तिवाचन ।।**

**।। मनोगत ।।**

**।। प्रकाशकाचे मनोगत ।।**

**।। अनुक्रमणिका (अक्षरवार शब्दसंख्या) ।।**

**।। श्रीमद्‌भगवद्‌गीता ।।**

**।। श्रीमद्‌भगवद्‌गीता – शब्द श्लोक सूची ।।**

**सर्व हक्क राखीव**

॥ ते हे मंत्ररहस्य गीता ॥

श्रीमद्भगवद्गीता – शब्द श्लोक सूची



शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभाङ्गम् ।
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं
वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ॥

।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

श्रीमद्भगवद्गीता – शब्द श्लोक सूची



## अथ श्रीमद्भगवद्गीतामाहात्म्यम्

गीताशास्त्रमिदं पुण्यं यः पठेत्प्रयतः पुमान् । विष्णोः पदमवाप्नोति भयशोकादिवर्जितः ।।१।।
गीताध्ययनशीलस्य प्राणायामपरस्य च । नैव सन्ति हि पापानि पूर्वजन्मकृतानि च ।।२।।
मलनिर्मोचनं पुंसां जलस्नानं दिने दिने । सकृद्गीताम्भसि स्नानं संसारमलनाशनम् ।।३।।
गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः । या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद्विनिःसृता ।।४।।
भारतामृतसर्वस्वं विष्णोर्वक्त्राद्विनिःसृतम् । गीतागङ्गोदकं पीत्वा पुनर्जन्म न विद्यते ।।५।।
सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः । पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ।।६।।
एकं शास्त्रं देवकीपुत्रगीतमेको देवो देवकीपुत्र एव । एको मन्त्रस्तस्य नामानि यानि कर्माप्येकं तस्य देवस्य सेवा ।।७।।

# ।। स्वस्तिवाचन ।।

प्रज्ञाचक्षु संत श्री गुलाबराव महाराज यांनी असे म्हटले आहे की, ‘गीता संवलित महाभारत’ हा भारत देशाचा राष्ट्रीय ग्रंथ असून पुढील काळात भगवद्गीता अवघ्या जगाचा धर्मग्रंथ ठरणार आहे. श्री महाराजांचे हे म्हणणे काही लोकांना साहसिक वाटले तरी व्यासंगी व्यक्तींना मात्र श्री महाराजांचा हा विचार पटल्याशिवाय रहात नाही. जगातील सर्वात बृहत्काय असलेल्या लक्ष श्लोकात्मक महाभारतात अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, भारताचा इतिहास, भूगोल आणि भरत वंशाची कथा या ज्ञानकोश सदृश असंख्य विषयांसह वेद, उपनिषदातील तत्त्वविचारांचा सर्व आशयही सामावला आहे.

महाभारताच्या सर्वतत्त्वविचारांचे सार भगवद्गीतेच्या केवळ ७०० श्लोकात समाविष्ट होते. वस्तुत: गीता, महाभारताचे सार आहे आणि महाभारत गीतेचा विस्तार आहे.

उपनिषदरूप गायींचे दोहन करून भगवान् गोपाल-कृष्णाने आपणासाठी उपलब्ध केलेले अमृतोपम दूध म्हणजे भगवद्गीता असेही गीतेचे सार्थ वर्णन केले जाते. आपल्या संस्कृतीत असंख्य ग्रंथ असले तरी सर्व शास्त्रांच्या समन्वयामुळे, प्रासादिक भाषाशैलीमुळे, अतिशय लघुकाय असल्याने व श्री भगवंताच्या मुखातून निघालेली जाग्रत श्रुती असल्यामुळे गीतेची सर कुठल्याही ग्रंथाला येऊ शकली नाही. गीतेच्या लोकप्रियतेने तिचा विश्वसंचार झाला आणि सर्व उदार विचारवंतांनी तिची वेळोवेळी वाखाणणी केली. भारताच्या धार्मिक क्षेत्रातील प्रत्येक विभूतीला गीतेसंबंधी काहीतरी लिहिणे प्रकर्षाने आवश्यक वाटले. भगवान् शंकराचार्यादि सर्व आचार्यांनी तिला वेद-वेदांताचे सार म्हटले, तर लोकमान्य टिळकांनी भारतीय वाङ्मयातील कोहिनूर व आचार्य विनोबाजींनी आई म्हटले आहे. सर्व श्रेष्ठ लोकांनी भगवद्गीतेची महती मोठ्या प्रेमभरे गायिली आहे.

कुरुक्षेत्रावरील युद्धाच्या आरंभी किंकर्तव्यमूढ झालेल्या अर्जुनाला स्वकर्तव्यासाठी उद्युक्त करणारा हा भगवान् श्रीकृष्णांचा पाऊण-एक तासाचा उपदेश अवघ्या मानवजातीच्या उद्धारासाठी समर्थ आहे. कारण, परिस्थितीजन्य मोहामुळे संभ्रमात पडलेल्या कोणाही व्यक्तीस कल्याणकारी श्रेयोमार्गाचे मार्गदर्शन करण्याचे अप्रतिम आणि अपार सामर्थ्य या दिव्य भगवद्वाणीमध्ये आहे. भगवंतांच्या गीता उपदेशात ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग व राजयोग यापैकी कशाला प्राधान्य आहे याबद्दल विविध भाष्यकारांची व विद्वानांची मते भिन्न आहेत, तरी प्रत्येक व्यक्तिच्या मार्गदर्शनासाठी गीतेसारखा अन्य ग्रंथ नाही ही एकवाक्यता असल्यामुळे सर्वसामान्यांनी वरील मतभेदाच्या फार तपशीलात न जाता इतकेही लक्षात घेतले तर पुरे आहे, की वरीलपैकी कोणताही योग प्रत्येकाने आपापली आवड व कुवत यानुसार स्वीकारावा आणि अन्य योगांची यथाशक्य जोड देत परमार्थपथावर मार्गस्थ व्हावे. वस्तुत: गीतेतील प्रत्येक अध्याय वेगवेगळा योग म्हणून गणला गेला आहे आणि अर्जुनाने ‘यच्छ्रेय: स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे’ म्हणजे ‘माझे कल्याण कशात आहे?’ असे विचारलेले असून

तद्‌नुसार भगवंतानेही ज्याच्या त्याच्या कुवतीनुसार झेपेल अशा श्रेयोमार्गाचाच उपदेश केला आहे. प्रत्येकाला उपयोगी अशी साधनसामग्री गीतेत उपलब्ध असल्यामुळे अर्जुनाला निमित्त करून प्रत्येक मानवासाठी उपयोगी पडेल असाच गीतेतील उपदेशाचा रोख आहे.

पण यासाठी हा ग्रंथ एकदा वाचून हातावेगळा करून चालणार नाही. तो नित्य परिशीलनात असणे अगत्य आहे आणि दुसरे असे की, त्याची पारायणे करूनही भागणार नाही. आपल्या जीवनाच्या सर्वच समस्यांचे समाधान भगवद्‌गीतेतून शोधायचे असेल तर भगवद्‌गीतेच्या वैचारिक संचिताचे चिंतन होणे आवश्यक आहे. आधुनिक नव्या पिढीतील जिज्ञासू वाचकाला असे सहजपणे व विनासायास करता यावे यासाठी हे सर्व विचारधन वाढत्या तंत्रज्ञानाच्या या युगात यंत्राच्या माध्यमातून अधिकाधिक युवकांपर्यंत पोहोचते करणे आवश्यक होते. आधुनिक जिज्ञासूंची ही आवश्यकता लक्षात घेऊन श्री. आदेश वसंत अत्रे, सौ. पुष्पा अरुण जोशी आणि सौ. सुषमा प्रकाश समुद्र यांनी अगदी भगवद्‌सेवेच्या वृत्तीने ही अपेक्षापूर्ती केली आहे.

प्रस्तुत रचनेत भगवद्‌गीतेतील शब्द, श्लोक व चरणांची सूची व महत्त्वाचे सर्व विचारधन समाविष्ट केलेले असून ते छोट्याशा तबकडीत भरून वाचकाच्या हाती सुपूर्त केले आहे. आधुनिक संगणकीय तंत्रज्ञानाच्या माध्यमाने आधुनिक पिढीसाठी त्यांनी या आधीही संपूर्ण श्री ज्ञानदेवगाथा, श्री अमृतानुभव आणि संपूर्ण श्री नामदेव गाथा शब्द, अभंग, चरण सूचीसह तयार करून प्रकाशित केले आहेत. अशा प्रकारच्या कार्याचा ध्यास घेऊन ते पूर्णत्वाला नेणे हे चिकाटी, परिश्रम व दक्षता यांच्या अभावी शक्यच नाही. या सर्वांनी अत्यंत श्रध्देने सर्वात्मक ईश्वराची ही जी वाङ्मय-अर्चना साधली आहे, ही नितांत अभिनंदनीय होय ! आपली वर्तमान पिढी आणि भावी पिढ्या या सेवेने ऋणाईत झाल्या आहेत. त्यांच्या या गीताविषयक वाग्यज्ञाचे स्वस्तिवाचन करताना माझे मन आनंदाने व कौतुकाने प्रफुल्लित झाले आहे. धन्यवाद व पुन:पुन्हा अभिनंदन !

श्री ज्ञानेश्वरपदाश्रित



धर्मश्री, पुणे

(स्वामी गोविंददेव गिरी)

# ।। मनोगत ।।

श्री भगवानुवाच
देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ।। अ. २/३०

श्री भगवानुवाच
यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम ।। अ. ९/२७

श्री भगवानुवाच
मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ।। अ. १८।६

अर्जुन उवाच
नष्टो मोह: स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।
स्थितोऽस्मि गतसन्देह: करिष्ये वचनं तव ।। अ. १८।७३

संजय उवाच
यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। अ. १८।७८

## ।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

**श्रीमद्भगवद्गीता - शब्द श्लोक सूची**

वैकुंठवासी पी.व्ही. कुलकर्णी उर्फ पमा माझा मोठा भाऊ, भाचा आदेश अत्रे आणि जावई समीर कुसुरकर या त्रिमूर्तींचे हे अद्वैत प्रकाशन . 'ऐसी नानावर्णे रूपडी', 'तुका झालासे कळस', 'बाप रखुमादेवीवरू' असे अनेक प्रकल्प या प्रकाशनाद्वारे सिध्दीस नेले आहेत. आजच्या संगणक युगातील तरुण पिढीला संत वाङ्मयाचा लाभ मिळावा, रस, गोडी चाखता यावी यासाठी हा प्रयत्न. 'शहाणे करुनि सोडावे बहुत जन' हा उद्देश, अत्यंत प्रामाणिक तळमळ. आदेश, समीर, माझा भाऊ श्री.पी.व्ही. या त्रयींनी खूप कष्ट घेतले आहेत, जीवाचे रान केले. आज 'मनोगत' रुपाने माझाही खारीचा वाटा या गीता शब्द-श्लोक सूचीसाठी ! श्रीमद्भगवद्गीता हा महन्मंगल जगन्मान्य परमपवित्र असा ग्रंथ. त्या ग्रंथराजावर मी काही बोलणे म्हणजे मुंगीने हिमालयाचे अत्युच्च्य शिखर गाठणेच होय पण मनोगत आहे हे ! गीतेमध्येच भगवंतच स्वत: आश्वासन देतात, 'बहुनां जन्मनामन्ते ज्ञानवान्माम् प्रपद्यन्ते.... हा दिलासा मलाही धैर्य देऊन जातो आणि मी सैलावते, ऐसपैस होते.

शब्द । वर्णमालेतील अनेक अक्षरांच्या मदतीने शब्द तयार होते त्याला गंध, रुप, स्पर्श, आकार आदि प्राप्त होते. अर्थ-भावार्थ प्राप्त होतो. आकाशाचा गुण शब्द ! निर्गुण निराकार, परब्रह्म गगनसदृश. त्या परब्रह्माला सगुणात आणायला, आकारात बांधायला शब्दांचाच आधार. आकाशी झेप घ्यायला शब्दांचीच मदत आणि म्हणून तर हा शब्द-श्लोक-सूचीचा पसारा.

पी.व्ही. अर्थात पमा. माझा मोठा भाऊ. त्याच्याविषयी थोडे मनातले बोलल्याशिवाय मी पुढे जाऊच शकत नाही. या क्षणी माझ्या मनी बालपणापासूनच्या असंख्य आठवणी उसळून येत आहेत. डोळ्यांत आसवं उभी राहिली आहेत. वयानुसारच आम्हा दोघांमधील नाते वाढत होते, फुलत होते. मला आधार द्यायला, सोबत करायला, कविता कशी समजून घ्यावी, पुस्तके कशी अभ्यासावी, लेखक कसा जाणून घ्यावा, व्याख्यानं कशी ऐकावीत हे सारे त्याने मला शिकविले. हे शिकवता शिकवता माऊलींची ज्ञानेश्वरी कशी अभ्यासावी हेही तो केव्हा सांगू लागला, समजलेच नाही. त्याची ती अध्यात्म-मार्गावरील वाटचाल, त्याचे ते वर वर चढत जाणे भारुन आणि भारावून टाकणारे होते. सारी अवघड वाट तो लीलया चढत होता. त्याचे ते 'ब्रह्मण: पथि' पुढे पुढे जाणे, मन थक्क करणारे होते.

जैसि कमळकळिका जालेपणे । हृदयीच्या मकरंदा राखो नेणे । दे राया रंका पारणे । आमोदाचे ।।

तसे त्याचे व्हायचे. त्याचे फोन येत, बोलणे प्रापंचिक नसे. तर माऊलींच्या ज्ञानेश्वरीतील एखादी ओवी, एखादा सिध्दांत - त्यावरील सुरेख उपमा-दृष्टांत, त्यातील भावार्थ, माधुर्य, काव्य, भक्ती या संदर्भात तो भरभरुन बोलायचा. तू स्वत: वाच म्हणायचा. सगळे संदर्भ मला समजावेत म्हणून अनेक लेखकांनी संपादित केलेल्या 'ज्ञानेश्वरी' त्याने वेळोवेळी मला दिल्या. माऊलींच्या परिभाषेशी माझा परिचय होत गेला. आम्हा दोघा बहिण-भावात 'शब्देविण संवाद' घडू लागला. मीही थोडीथोडी माऊलींच्या चिद्विलासात, अद्वयानंदात

डुबकी मारु लागले. जणू तो माझा ज्ञाना आणि मी त्याची मुक्ताई असे नाते निर्माण झाले. ज्ञानेश्वरी-गीतेने मला वेड लावले. माझा वाटाड्या माझा मोठा भाऊ होताच बरोबर शिवाय स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, पांडुरंगशास्त्री आठवले आदि वंदनीय - पूजनीय जन ज्ञानदीप हाती घेऊन वाट दाखवित होते.

स्वामी विवेकानंद म्हणतात 'गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण आपल्याला मेंदू, हृदय आणि हात यांच्या शक्तीचा विकास करुन घ्यावा आणि त्या विकासाच्या साह्याने मोक्षाची, पूर्णत्वाची प्राप्ती कशी करुन घ्यावी याची समन्वयात्मक शिकवण देतात. म्हणूनच गीतेमध्ये ज्ञान, भक्ती, कर्म आणि योग यांचा सर्वोच्च अविष्कार झाला आहे.

'गीतारहस्य'कार लो. टिळक म्हणतात 'गीता हे कर्मयोग शास्त्र आहे. ज्ञान, कर्म, भक्ती व संन्यास यांचा कसा मेळ घालावा, मिलाफ करावा आणि त्याद्वारे आपल्या आयुष्यक्रमणाचा कोणता मार्ग मनुष्याने स्वीकारावा हे गीता सांगते. गीतेच्या नित्य वाचनाने, चिंतनाने मनाचे समाधान होते, आनंद होतो. गीता म्हणजे वैदिक धर्मातील राजगुह्याचा परिस आहे. संसारच मोक्षरूप कसा करावा हे गीता सांगते म्हणून वृध्दपणी नव्हे तर तरुणपणीच गीतेचा अभ्यास करायला हवा.

श्री. पांडुरंगशास्त्री आठवले म्हणतात, 'गीता म्हणजे भगवंताच्या मुखारविंदातून स्रवलेले माधुर्य व सौंदर्य यांचे वाङ्मयीन स्वरूप होय. गीता मानवाला जीवन जगण्यास हिंमत देते. जीवन हे रडण्यासाठी वा पळून जाण्यासाठी नाही, तर खेळण्यासाठी, हसण्यासाठी आहे हे शिकवते. संकटांना हिंमतीने तोंड देण्यास शिकविते. अखंड आशा आणि अतूट श्रध्देच्या बळावर स्व-विकास साधण्यास शिकविते. ही गीता वेद व उपनिषदे ह्यातील महासागराला लहानशा घागरीत सामावणारी सर्वशास्त्रमयी अशी आहे.

ज्ञानराज माऊली सांगतात, 'महाभारत हे महाकाव्य म्हणजे पूर्ण विकसित असे सुंदर कमलपुष्प आहे आणि 'संवादिला श्रीरंगु' असा गीताग्रंथ म्हणजे परागु आहे. हे तो वाङमयी मूर्ति श्रींची ! ' मन प्रसन्न करणारी, अत्यानंद देणारी, त्रिखंडात आदि-वंद्य अशी, तत्वज्ञ, संत, कवी, साधक, मूमुक्षू, भक्त या सर्वा-सर्वांना भावणारी, आवडणारी, म्हणूनच म्हणते बुध्दीचं तपेलं इवलुसे असणारी मी या साऱ्या भाष्यकाराते वाट पुसतुचं जाणार नं !

अशा या गीतारुपी महासागरात विहार करायचा, संचार करायचा, वाचन-मनन-चिंतन करायचे, दैनंदिन जीवनात ती उपयोगात आणायची तर माऊली म्हणतात त्याप्रमाणे अशा साधकाने व्हायला हवे, कसे ? तर

जैसे शारदीचिये चंद्रकळे । माजि अमृतकण कोवळे ।
ते वेचिती मने मवाळे । चकोरतलगे ।।

## ।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

**श्रीमद्‌भगवद्‌गीता - शब्द श्लोक सूची**

अगदी चकोराच्या पिलासारखे मृदु, मवाळ, हळुवार मन करायचे म्हणजेच भगवंताची ही वाङ्मयी मूर्ती समजून, आकळून, उमजून घेऊ शकू आणि त्यासाठी ही गीता-शब्द-श्लोक सूची म्हणजे आपणा सर्वांसाठी एक पर्वणीच आहे, संगणक युगातील सीडी रूपात हाती येणारी !

ही गीता शब्द-श्लोक सूची आहे अकारविल्हे. अगोदरच मी म्हटलयं आकाश सदृश परमात्म्यापर्यंत पोचण्यासाठी गीतेतील प्रत्येक शब्द नितांत उपयोगी. आणि आपल्याला आमच्या या सूचीमध्ये ते सर्व सहज मिळणार आहे. आता पहा ना 'च' हे संस्कृत अव्यय, उभयान्वयी दोन शब्द, दोन वाक्ये, दोन महत्त्वाचे सिद्धांत जोडणारे तर गीतमध्ये हे'च' 'आणि' या अर्थाने आलेले अव्यय जवळ-जवळ ३९० वेळा आलेले आहे. हा शोध या सूचीने घेतलेला आहे. हे केवढे कष्टाचे, किचकट आणि म्हणूनच अत्यंत कौतुकास्पद !

'तस्माद्' हा शब्द असाच वेगळ्या अर्थाने महत्त्वाचा. सूचीद्वारे लक्षात येते की तो २५ वेळा आला आहे. फक्त दोन वेळा 'अर्जुन उवाच' मध्ये

१) तस्मान्नार्हा वयं हन्तु.... हा श्लोक १-३७
२) तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं...हा श्लोक ११-४४

तर २३ वेळा 'भगवानुवाच'मध्ये. पण या प्रत्येक ठिकाणी भगवंत अत्यंत महत्वाचा विचार अर्जुनाच्या पर्यायाने आपल्या गळी ठासून उतरविण्यासाठी.

योग हा शब्द 'समत्वं योग उच्यते' इथे समत्व योगासाठी 'योग: कर्मसु कौशलम्'. इथे कर्मयोग या अर्थाने तर युक्ताहार विहारस्य... योगो भवति दु:खहा । या श्लोकात ध्यानयोग या संदर्भात अशा विविध छटा -अर्थच्छटा आपल्या लक्षात येतात. तसेच योगम्, योगी, योगिन: असे सर्वच युज् - जोडणे या धातूपासून तयार झालेले शब्द कितीतरी अर्थच्छटा स्पष्ट करणारे हे आपल्याला या सूचीमुळे अगदी सहजतेने अभ्यासता येतील. 'विध्दि' म्हणजे 'जाणून घे' हा शब्द गीतेत २४ वेळा. या शब्दातून भगवंतांची तळमळ, माया, वात्सल्य दिसते. केवळ अर्जुनाचेच नव्हे तर आपल्या सर्वांचे हित पाहणारे भगवंत आपल्याला दिसतात. आणखी एक उदा. 'तत्' शब्द ५५ वेळा आला आहे. अध्याय १३ मध्ये तत् = परब्रह्म, आत्मतत्व या अर्थाने तर १७व्या अध्यायात ॐ तत् सत् येथे 'तत्' सर्व काही त्यांचेच ते त्याला अर्पण असा अलिप्तता भाव येथे दिसतो. तर 'तत्' म्हणजे ते अशी व्याख्यारूपी विधाने करताना निर्देशवाचक अशी अनेक उदाहरणे देता येतात आणि अकारविल्हे - मुळे ज्ञान, कर्म, भक्ती, संन्यास, योग अशा अनेक विषयांचा बारकाईने, खोलवर अभ्यास करण्यासाठी एकत्रितपणे ते शब्द मिळतात आणि विषय सलग अभ्यासता येतो. आमच्या सूचीची झलक दाखविली, प्रत्यक्ष अनुभव हा ज्याने, त्याने घ्यावा. मुख्य म्हणजे सीडी रुपाने हे अक्षर वाङ्मय सर्वार्थाने अ-क्षर अविनाशी होणार आहे, अमर ठरणार आहे.

## ।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

**श्रीमद्भगवद्गीता – शब्द श्लोक सूची**

मुळात श्रीमद्भगवद्गीता हा जगद्वंद्य ग्रंथ. या गीतेचा जन्म मोठा नाट्यमय. युद्ध भूमीवर हे तत्वज्ञान सांगितले गेले. दोन्ही पक्षांनी युध्दाची जय्यत तयारी केलेली. दोन भावांच्या – पंडू व धृतराष्ट्र मुलांमध्ये हे युद्ध – पांडव नि कौरव ! आणि सरळ, प्रेमळ, सात्विक वृत्तीचा अर्जुन म्हणूनच द्विधा मनस्थितीत ! पितामह, गुरुजन, आप्तेष्ट, बंधू, मी–माझे यात गुरुफटलेला अर्जुन, द्वंद्वात अडकलेला, सुख–दु:ख, यश–अपयश, चांगले–वाईट, सत्–असत्, श्रेयस–प्रेयस या द्वंद्वात. असाच संघर्ष मानवी मनातही सदैव चालूच असतो. जणू माणसाचे मन हे 'कुरुक्षेत्र' बनते. मानवी मनातल्या मनोव्यापाराला मन–बुद्धि–चित्त–अहं असे अंत:करण चतुष्टय बळी पडते. त्याच्या हातून भली बुरी कर्मे घडत असतात. तो माणूस मग कर्म बंधनाच्या जन्ममृत्युच्या चक्रात अडकतो आणि श्रेयस आत्यंतिक सुख, निर्वाणीचा आनंद यापासून कोसो दूर जातो. तेच मन, तेच अंत:करण धर्मक्षेत्र कसे होईल, हे भगवान श्रीकृष्ण गीतेच्या रुपाने एकट्या अर्जुनालाच नव्हे तर अवघ्या मानव जातीला सांगतात, जणू गीतारुपी अमृताचा वर्षाव करतात.

''...... जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्यच।'' जन्माला येणाऱ्या प्रत्येकासच मृत्यु अटळ, अपरिहार्यच ! 'देह विनाशी हा तर आत्म्याचा पेहराव' ही आत्म्याची खोळ. जसे जुनी फाटकी वस्त्रे आपण सहज टाकून देतो तितक्या सहजतेने बदलायला हवी. आत्मा म्हणजे देहात वास करणारे विशुध्द चैतन्यतत्व, परमात्म्याचा अंश ! तो केवळ अविनाशी, अविकारी, अव्यय, अच्छेद्य, अदाह्य, अक्लेद्य, अशोष्य, अचल, अव्यक्त, अचिन्त्य, अव्यक्त, नित्य, सर्वगत, व्यापक असा आहे. पण अर्जुनाचा मोह. अर्जुनाचे – नव्हे आपलेही अज्ञान असे की, मी कर्म करतो, मी मारतो , मी मारणार, मला पाप लागेल या कर्तृत्व–भोक्तृत्व भावामुळे अर्जुनाचा–आपला शुध्द अहं जीवदशेकडे ओढला गेलेला, म्हणून तर ज्या रणभूमीवर प्रेतांचा खच पडणार आहे, रक्ताच्या नद्या वाहणार आहेत, त्या ठिकाणी भगवंत आत्म्याचे अमरत्व सांगत आहेत.

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ।। अ २/३०

मरणाऱ्यांचा शोक नको कारण फक्त देह जाणार. आत्मत्व अवध्यच आहे हे भगवंत समजावतात.

जन्म, बाल्य, कौमार्य, तारुण्य, प्रौढत्व, वृध्दत्व हेच केवळ व्यक्त. व्यक्तमध्यानि पण या अवस्था जितक्या सहज तितकाच मृत्युही सहजच मानता येईल, मानता यायला हवा. तोही केवळ एक नैसर्गिक बदल होय हे जाणायला हवे. पण 'व्यक्तमध्यानि' म्हणजे कर्म अटळ, तोच आपला स्वधर्म आणि स्वधर्मपालन हाच जणू यज्ञ ! तो कसा पवित्र करायचा याची युक्ती भगवंत सांगतात.

कर्मण्येवाधिकारस्ये मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङगोऽस्त्वकर्मणि ।। अ २/४७

ही कर्मयोगाची चतु:सूत्री ! ती अंगी मुरवायची, आचरणात आणायची, आपल्या वाट्यास आलेले नियत कर्म, भगवंताला अर्पण करता येईल असे सुगंधी, टवटवीत, विविधरंगी सुंदर मन प्रसन्न करणारे फुलच होईल; हे बघायचे आणि माऊली म्हणतात,

तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्म कुसुमांची वीरा ।
पूजा केली होय अपारा । तोषालागी ।।

अशी ही स्वकर्म कुसुमे भगवंतांना, भगवंत प्रसन्न होण्यासाठी अर्पण करायची असे कर्मामध्ये कौशल्य आणून कर्मयोग साधायचा. साऱ्या सात्विक कर्माचे फल चरण-आंघ्रयुगुली अनन्य भावे अर्पण करायचे, मी माझेपण विसर्जित करायचे, हाच खरा महान यज्ञ ।

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम ।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्म समाधिना ।। अ ४/२४

चराचर विश्व 'त्या'चे, त्याने व्यापलेले, निर्मिलेले मी ही त्याचाच अंश. 'त्या'चे आहे ते 'त्या'ला अर्पण ! देणारा 'मी' कोण ?.... असे अत्यंत युक्ती युक्तीने, हळुवारपणे, आईच्या मायेने, आपले कर्म हे नैष्कर्म्य, अकर्म, पाप पुण्यातीत कसे करावे हे भगवंत आपल्याला सांगतात.

आत्मा – प्रत्येक देहातील चैतन्य तत्व – म्हणजे परमात्म्याचा अंश होय, हे तत्वत: जाणणे, हा ज्ञानमार्ग, विहंगम मार्ग, झटकन् फलप्राप्ती होणारा पण सामान्य जनांना अत्यंत अवघड, कष्टकारक, क्लेशकारक होय परंतु नुसते कर्म करणे म्हणजे 'जन्मा आला हेला आणि पाणी भरता भरता गेला'असेच आपले होते. कर्ममार्गातील कौशल्य आपल्या हाती सापडत नाही व सामान्य आपण केवळ कर्मकांड करीत रहातो. हे दोन्ही मार्ग रूक्षच, आपल्याला कोरडे ठेवणारे, काय साध्य हाती लागणार त्यामुळे ? कसे गाठणार ते परमधाम ? टिळा, टोपी, भगवी वस्त्रे, आपल्या माणसापासून विजनवासात राहणे म्हणजे का खरा संन्यास ? नाही. कारण मनातला संसार पुसला जातच नाही, सारा षड्‌विकारांचा, षट्‌रिपूंचा बाजार मनात ठाण मांडून असतो. त्या देवाला, आत्मतत्वाला जागाच नाही मिळत आपल्या अंत:करणात, तर दूरस्थ 'त्या'ला कसे शोधणार ?

मनुष्य जन्माचे तर सार्थक व्हायला हवे. मनुष्य योनीत कर्माचे स्वातंत्र्य आहे, म्हणून देवादिकांनाही मनुष्य योनीचा मोह पडतो. अशा मनुष्य जन्माचा सदुपयोग करुन घ्यावा. देहाचा मोह म्हणजे तमोगुण, तमोगुण म्हणजे अज्ञान, म्हणूनच देहभावात गुंतणे हे अज्ञान. कर्माचा आणि विकार (परिवर्तन) यांचा मोह म्हणजे रजोगुण तर ज्ञानाचा मोह हा सत्वगुण.

पण माणसाला सत्वगुणाचाही अहंकार व्हायला लागतो, त्या अहंकारापायी तो जणू उंच कड्यावरच्या निसरड्या वाटेने वेगाने खाली खाली खोल दरीत कोसळतो, पुन्हा वर चढण्याची वाटही बिकट होऊन बसते.

मात्र भगवंत अत्यंत सोपी युक्ती सांगतात; त्याच्या सुहृदाला - सखा अर्जुनाला आपल्या हृदयीचे - राजगुह्य अर्जुनाच्या हृदयी कथन करतात. ती भक्तीची युक्ती होय. भक्त म्हणजे जो विभक्त नाही तो. भगवंताशी अनन्यभावे जोडला गेला आहे तो. भगवंतांना सर्वभावे शरण गेलेला, अखंड, अविरत, निरंतर ध्यानी-मनी-स्वप्नी भगवंताची आठवण काढणारा तो भक्त ! ती बिल्वमंगल पारध्याची गोष्ट आहे नं ! नकळतच त्याने शिवलिंगावर बिल्वपत्रे वाहिली, ती ही महाशिवरात्रीच्या दिवशी ! आणि तो तरून गेला हा मृत्युसागर. शबरीचे काय झाले ? ‘राम येतील माझा उद्धार होईल’ असे म्हणत म्हणत त्या रामनामाचे चिंतन करीत राहिली. एवढा एकच ध्यास तिने आयुष्यभर घेतला. पार म्हातारपणी रामराय तिला भेटले नि ती राममय झाली.बुद्धिमंत हनुमानाची तीच कथा ! ‘राम नामाने’ त्याला रामांच्या बाणांपासून वाचविले चिरंजीवच तो ! नाम भक्तीने चिरंजीव राहिला.

भगवंत गीतेत सांगतात,

‘‘यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय् तत्कुरुष्व मदर्पणम् ।। अ ९।२७
‘‘मन्मनाभव मद्‌भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
भावसमन्वित हो मय्येव मन आधत्स्वं मय्यर्पितमनोबुद्धिः

‘मयिचानन्य योगेन भक्तिरव्यभिचारिणी’ ‘मामेकं शरण व्रज’ माझ्यासारख्या सामान्यांसाठी सोप्या भाषेत सांगायचे तर -

बोललो चाललो तुझी स्तुती केली ।
हिंडलो फिरलो तुला प्रदक्षिणा घातली ।।
जेवलो खाल्लो तुला नैवेद्य दाखविला ।
निजतो आता तुला साष्टांग नमस्कार केला ।।

हा भक्तीचा सुलभ असा राजमार्ग ! मळलेली पाऊलवाट ! चुकण्याचा धोका नाही, घसरण्याची भीती नाही, तर उलट ते चतुर्भुज परब्रह्म भक्ताला - नव्हे आपल्याला दोन हातांनी आलिंगन देतील आणि दोन हातांनी त्यांच्या हृदयात - अंत:करणात - भक्तासाठी आसन मांडतील. भक्त आणि देव यांच्या दोघात आपोआप समरसता येईल. भक्त

भगवन्मय होईल. मृण्मय जीव चिन्मय शिव होईल. जसे पावले दोन चाल एक, शिंपले दोन मोती एक, ओठ दोन शब्द एक, टिपऱ्या दोन नाद एक, डोळे दोन दृष्टी एक, शिव-शक्ती दोन मिळून परब्रह्म असे एक अद्वैत निर्माण होईल. त्या क्षणी काम, क्रोध, दर्प, दंभ, अहंकार, कठोरत्व हे षड्‌रिपू भक्ताचा-आपला त्याग करून कोसो दूर गेलेले असतील. मी-माझे-अहं या साऱ्यांचे विसर्जन झालेले असेल. जळी-स्थळी-काष्ठी दशांगुळे व्यापून उरणाऱ्या भगवंतांचे, परब्रह्माचे, परमात्म्याचे स्वरूप दिसू लागेल. नामा-जनी-तुका यांच्यासारखी अनन्य भक्ती ही आपली सहजप्रवृत्ती होईल आणि हीच तर ज्ञानोत्तर भक्ती । असा तो ज्ञान-कर्म-भक्ती यांचा सुंदर मेळ घातला जाईल आणि अर्जुनासारखी

नष्टो मोह: स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।
स्थितोऽस्मि गतसंदेह: करिष्ये वचनं तव ।। अ १८।७३

अशी आपली वृत्ती नि:संदेह होईल. मनातील आशंका फिटतील. आपण छिन्नसंशय होऊ. आपल्या मनातील तर्कांचे जोडे दूर भिरकावले गेले असतील. जीवन समराला आपण हसतमुखाने सामोरे जाऊ.स्थितप्रज्ञ, ज्ञानी, ध्यानयोगी, उत्तम भक्त

उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वर : ।
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुष: पर: ।।

असा क्षेत्रज्ञ, गुणातीत या सर्व आदर्श व्यक्तिमत्वांचा सुरेख संगम आपल्या एका अंत:करणात झालेला असेल. याच अर्थाने भगवंत सांगतात की,

सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षशिष्यामि माशुच: ।।

अनन्य, अव्यभिचारी भक्तीची कास धर, कर्ममार्गाला, ज्ञानमार्गाला, प्रवृती-निवृत्तीला, भक्तीची जोड दे. आपोआपच ज्ञान-विज्ञान जाणले जाईल. विज्ञान ते सरे, ज्ञानही न उरे अशी गुणातीताची परम पवित्र, श्रेष्ठ, शाश्वत, 'सुखस्यैकांतिकस्य' अवस्था येईल. 'ॐ'कार स्वरुप परब्रह्मात समरसून जाशील, हीच ती परमधाम प्राप्ती ! हाच तो अंतरीचा ज्ञानदीप उजळणे होय ! आपली जणू गरम तुपातील तळलेली पक्क पुरी होणे, लोणी कढवून ! साजूक तुप तयार होणे, मातीचे कच्चे मडके तावून सुलाखून पक्के मडके होणे. मांजरीच्या स्वाधीन राहणारे, नुकतेच जन्मलेले मांजरीचे पिल्लू होणे, शहाळे-नारळ असा प्रवास करीत खडखडीत गोटा होणे अशी किती उदाहरणे सांगू ?

## ।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

**श्रीमद्‌भगवद्‌गीता - शब्द श्लोक सूची**

हाच तो मोक्ष ! हीच ती परम अवस्था ! हेच ते परमधाम ! अव्यय शाश्वत पद ! हीच ती निर्वाणीची शांती ! हेच ते 'आनंदाचे डोही, आनंद तरंग' होणे. आत्मा बिंदूवत म्हणून बिंदूचे सागराला मिळणे, आत्मतत्त्व, चित्सूर्याचा अंश, त्या तेजाने चित्सूर्यात मिसळणे.

अर्जुन हे सारे समजला म्हणूनच तर त्याला स्वकर्तव्याची, स्वधर्माची स्मृती प्राप्त झाली. तो 'आहाळ बहाळी' ईशवचन पूर्तीसाठी सिध्द झाला. 'करिष्ये वचनं तव' असे म्हणता झाला.

विशेष म्हणजे भगवंताच्या मुखातून पाझरलेल्या या अमृतधारेत महर्षी व्यास शिष्य संजय न्हाऊन निघाला. तृप्त तृप्त झाला, आनंदाने नाच नाचला, जणू त्याने जन्मभरीच्या श्वासाइतुके हरीनाम मोजून तो मुरलीधर श्याम आपलासा केला नि इतका निर्भय झाला की बस्स हस्तिनापूरचा सम्राट राजा धृतराष्ट्र, त्याच्या रथाचे सारथ्य करणारा हा संजय पण व्यास महर्षींच्या कृपा प्रसादाने घडले हे, हस्तिनापूरच्या सम्राटास  निर्भयपणे ठणकावून सांगतोय -

यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर :<br>
तत्र श्रीर्विजयो भूति र्ध्रुवा नीतिर्मतिमम ।। अ १८।७८

आणि संपूर्ण गीता अभ्यासली की आपल्याला त्याचे बोलणे पूर्णतया पटतेच ना ! येथे योगेश्वर कृष्ण आणि धनुर्धारी पार्थाचे मनोमिलन झाले आहे; हे केवळ भावा-भावाचे वा दोन मित्रांचे मनो-मिलन नाही; तर गुरुशिष्य ऐक्य आहे, जीव-शिव मिलन आहे. देव-भक्त असा सुंदर, अद्‌भुत, अलौकिक मिलाफ आहे. पार्थ केवळ कृष्णमय, विष्णूमय झाला आहे म्हणजेच येथे धर्म-अर्थ-काम-मोक्ष या चारी पुरूषार्थांची प्राप्ती आहे आणि हे संजय सांगतोय गीतामृताच्या श्रवणाने अभय प्राप्त झालेला, मोठ्या छातीठोकपणे.

गंमत अशी की १८व्या अध्यायाचे नाव सुद्धा 'मोक्ष संन्यास योग' आहे. इतके कर्मफलाशारहित व्हायचं की मोक्ष फलाचा, आत्यंतिक, शाश्वत सुखाचा मोह न ठेवता केवळ 'अहं' चे विसर्जन करायचे. मन हे न-मन करायचे. त्या विश्वचालक, विश्व नियंत्याला अनन्य शरण जायचे. 'त्या'ची अव्यभिचारी भक्ती करायची, बुद्धियोग, ज्ञानयोग, ध्यानयोग, कर्मयोग या सर्वांपेक्षा भक्तीयोग साधणे अधिक सुलभ, सोपे म्हणून परत एकदाच नव्हे तर शतवार, अनंतवार तेच. यासाठी श्रीमद्‌भगवद्‌गीता समजून घ्यायची आणि गीता शब्द-श्लोक-सूची ही त्यासाठी मुलभूत आधार देणारी आहे. पुनरुक्ती होतेय पण विचार मत ठासून सांगण्यासाठी परत एकदा शब्द-अर्थ-भावार्थ त्यातून मनन-चिंतन-निदिध्यासन-उपयोजन असा प्रवास काया-वाचा-मने करत करत जीवनाचे श्रेयस गाठायचे बस्स !

## ।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

**श्रीमद्‌भगवद्‌गीता - शब्द श्लोक सूची**

आणि हे सगळे मनातले, अंतरमनात भावलेले बोलत असताना जणू मुंगीने आकाशी झेप घेण्याचा प्रयत्न केला आहे खरा. मुंगीची ताकद ती केवढी ! पण इच्छा प्रामाणिक ! प्रयत्न सच्चे, आंतरिक श्रद्धेचे ! मोजमाप तरी कसे सांगू ? तळमळ इतकीच ; की माझ्याकडून देखील नव्या पिढीला, संगणक युगातील पिढीला - माझ्या शब्दात गीतेचे महत्व समजावे, थोरवी समजावी, संत वाङ्मयाच्या अभ्यासासह गीतेचा त्यातून उपनिषदे, वेद यांचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळावी. आपल्या भारतीय संस्कृतीचे रत्नभांडार नव्हे असीम असा रत्नाकर त्याचा लाभ प्रत्येकाने घ्यावा म्हणून आमचा हा अल्पसा प्रयत्न ! सांगणे नव्हे; मागणे आहे, अल्पशी विनंती आहे.

''उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत्त ।'' गीता-शब्द-श्लोक सूचीच्या साहाय्याने गीताभ्यास सुरु करावा. सर्वांनी लहान वयात, तरुणपणी, आणि नसेल तर आत्ता कोणत्याही वयात अगदी या क्षणापासून !

या प्रकल्पाला सर्वतोपरी मदत करणाऱ्यांचे खूप खूप कौतुक व धन्यवाद ! आणि हो प्रफुल्लवहिनी, सावली सारखी सर्वार्थाने मागे उभी असणारी ! तिचे कौतुक करण्यास माझ्याजवळ शब्द नाही. माझ्या मोठ्या भावाच्या जीवनात आल्यापासून 'सप्तपदींचा खरा अर्थ जाणणारी ती'! मी तिच्या सुख-दुःखाची साक्षीदार आहे, जवळून तिला उमजून घेतले आहे. मी इतकेच म्हणेन की ती माझ्या मोठ्या भावाची - पद्‌माकराची 'लोपामुद्रा'च होय.

। श्रीकृष्णार्पणमस्तु ।

हरये नमः ! हरये नमः !! हरये नमः !!!

सौ. पुष्पा अरुण जोशी

# ।। प्रकाशकाचे मनोगत ।।

### ।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

ॐ पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ।।
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनी -
मम्ब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ।।
गीताशास्त्रमिदं पुण्यं य: पठेत्प्रयत: पुमान्
विष्णो: पदमवाप्नोनि भयशोकादिवर्जित: ।।
गीता सुगीता कर्तव्या किमन्यै: शास्त्रविस्तरै:
या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद्विनी सृता ।।
सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दन:
पार्थो वत्स: सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ।।

अद्वैत प्रकाशनातर्फे व्यासपौर्णिमा या मंगलदिनी भगवद्गीतेची ''ते हे मंत्ररहस्य गीता।'' ही शब्द-श्लोक सूची प्रकाशित करण्याचे भाग्य लाभले आहे. ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, दासबोध, नामदेव गाथा, ज्ञानदेव गाथा आणि अमृतानुभव तसेच हरिपाठाची शब्द ओवी / अभंग सूची याआधी अद्वैत प्रकाशनाने जिज्ञासूंना उपलब्ध करून दिल्या आहेत. ''बाप बाप ग्रंथ गीता । जो वेदी प्रतिपाद्य देवता । तो श्रीकृष्ण वक्ता । जिये ग्रंथी ।।'' (ज्ञा. ११/२६) म्हणजे वेदांचा प्रतिपाद्य विषय असलेल्या श्रीकृष्ण परमात्मा ज्या ग्रंथाचा वक्ता आहे त्या ग्रंथाची शब्द-श्लोक सूची प्रकाशित करताना परमानंद होत आहे.

## ।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

**श्रीमद्‌भगवद्‌गीता - शब्द श्लोक सूची**

महाभारताच्या संपूर्ण विवेचनाचे सार भगवद्‌गीतेच्या ७०० श्लोकांत आले आहे. हेच माउलींनी सुद्धा ‘‘तैसे शब्दब्रह्म अनंत । जाले सवालक्ष भारत । भारताचे शते सात । सर्वस्व गीता।'' (ज्ञा.१५/५७५) या ओवीतून विशद केले आहे.

कोणत्याही साधकाच्या आवडीनुसार आणि पात्रतेनुसार गीतेमधील कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तीयोग आचरणात आणून प्रत्येक व्यक्ती आपला आत्मोत्कर्ष करु शकते. ‘‘आत्मा जेणे हस्तगत । रत्न होय ।।''(ज्ञा. १८/१३२३) असेच माउलीही सांगत आहेत.

महाभारत युध्दाच्या प्रारंभी शत्रूपक्षात आपलेच स्वजन बांधव पाहून अर्जुन किंकर्तव्यमूढ झाला. करुणेने व्याप्त झाला.

‘‘दृष्ट्वेवं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ।।२८।।
सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ।।२९।।

अशी अर्जुनाची एकंदरीत अवस्था झाली. पुढे अर्जुनाने भगवंताला ‘‘शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।'' (२-७) असे शिष्यत्व स्वीकारुन कल्याणप्रद उपदेश करण्याची विनंती केली. अर्जुनाने शिष्यत्व पत्करल्यानंतरच भगवंतांनी ‘‘अशोच्यानन्वशोचस्त्वं'' (२-११) या श्लोकापासून उपदेश करण्यांस प्रारंभ केला. पुढे सांख्ययोग, कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तीयोग या सर्वांचे विस्तृत निरुपण गीतेत आले आहे. अखेरीस -

‘‘इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ।। (१८/६३)

‘‘हे गोपनीय ज्ञान तुला सांगितले. आता तू या रहस्यमय ज्ञानाचा योग्य विचार करुन मग जसे तुला आवडेल तसेच कर'' असे भगवंत अर्जुनाला सांगत आहेत. हेच आदर्श गुरुंचे लक्षण आहे. त्यानंतर अर्जुनसुद्धा आदर्श शिष्यत्वाचा मानबिंदू ठरणारा श्लोक सांगतो की, ‘‘नष्टो मोह: स्मृतिर्लब्धा त्वप्रसादान्मयाच्युत ।
स्थितोऽस्मि गतसन्देह: करिष्ये वचनं तव ।। (१८-७३)

''आपल्या कृपेने माझा मोह नाहीसा झाला आणि मला स्मृती प्राप्त झाली. आता मी संशयरहित होऊन राहिलो आहे म्हणून मी आपल्या आज्ञेचे पालन करीन।'' असे निसंदिग्धपणे वचन देतो. असा हा संक्षिप्तरुपात भगवद्गीतेचा घटनाक्रम सांगता येईल.

ऐसेया श्लोका शते सात । गीतेची पदे आंगे वाहत ।
पद्दे म्हणो की परमामृत । गीताकाशीचे ।। (ज्ञा. १८/१६६४)

हे गीतेतील परमामृत म्हणजेच सुविचार, सुवचने, सुभाषिते किंवा अगदी ब्रह्मवाक्य म्हणता येईल असे श्लोक वा श्लोकार्ध गीतेत पदोपदी विखुरले आहेत. त्यापैकी काहींचा आपण आस्वाद घेऊयात!

''गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डितः ।'' – २–११
''सुखदुःखे समेकृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।'' – २–३८
''कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।'' – २–४७
''स्वधर्मे निधनं श्रेयःपरधर्मो भयावहः।'' – ३–३५
''अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।'' – ४–०७
''परित्रायाण साधूनां विनाशाय च दृष्कृताम् ।'' – ४–०८
''न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।'' – ४–३८
''उध्दरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।'' – ६–०५
''तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।'' – ८–०७
''अनन्याश्चितयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।'' – ९–२२
''ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।'' – १८–६१
''सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।'' – १८–६६
''यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।'' – १८–७८

## ।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

**श्रीमद्‌भगवद्‌गीता - शब्द श्लोक सूची**

हे परमामृत सेवन करुन आपलीही माउलींसारखीच ''तैसा वाग्विलास विस्तारु । गीतार्थेसी विश्व भरु । आनंदाचे आवारू । मांडु जगा ।। (ज्ञा.१३/११५९) अशी तादात्म्य अवस्था होऊन गेली नाही तरच नवल !

असो. हा प्रबंध नसून प्रकाशकीय मनोगत आहे याचे भान हवे आहे. गीतेची ही शब्द श्लोक सूची कशी उपयुक्त आहे याचे सोदाहरण विवेचन प्रकल्प प्रमुख सौ. पुष्पा (आत्या) अरुण जोशी यांनी त्यांच्या मनोगतात केले आहे. त्यामुळे त्याची पुनरावृत्ती नको. सौ. पुष्पा जोशी यांनी विस्तृत, उपयुक्त आणि भावनोत्कट असे मनोगत व्यक्त केले आहे. वाचकांना ते नक्कीच अभ्यासपूर्ण ठरेल. गीतेच्या सूचीच्या या संपादनात सौ. पुष्पा जोशी आणि सौ. सुषमा प्रकाश समुद्र या द्वयीने महत्वपूर्ण योगदान दिले आहे. ''म्हणौनि गीता गावो म्हणे । ते गाणिवे होती लेणे ।'' (ज्ञा. १८/१७३७) ही माउलींची ओवी सार्थ ठरवीत सौ. सुषमा समुद्र यांनी अद्वैत प्रकाशनाच्या ''हे गीतासागरतरंग'' या गीतापठणाच्या व्हीसीडी मध्ये संपूर्ण अचूक, मधुर व श्रवणीय पठण केले आहे.

''तैसा कानाचा महाद्वारी । गीता गजर जेथ करी ।
तेथ सृष्टीचिये आदीवरी । जायचि पाप ।। (ज्ञा. १८।१५३३)

गीतेचा गजर जेथे कानरुपी महाद्वारात होतो तेथे ऐकणाऱ्यांचे सृष्टीआरंभापासूनचे पाप नाहीसे होते. नुसतीच गीता नाही तर गीता, महाभारत, भागवत या सर्व वाङ्मयाचे संपूर्ण भारतभर प्रवचनरुपाने प्रसार व प्रचार करणारे स्वामी गोविंददेव गिरि उर्फ आचार्य किशोरजी व्यास या महनीय विभुतींचे प्रस्तावनारुपी आशीर्वचन आणि स्वस्तिवाचन या गीता शब्द-श्लोक सूचीस लाभले आहे हे आमचे परमभाग्य ! या प्रकल्पाच्या प्रारंभीच आम्ही स्वामी गोविंददेव गिरी महाराजांना प्रस्तावना देण्याची विनंती केली आणि त्यांनी विनाविलंब अतिशय समर्पक शब्दांत गीतेची महती वर्णन करणारी प्रस्तावना दिली. संपूर्ण भारतभर गीता परिवाराच्या शाखांमार्फत स्वामींचा गीता प्रसार चालू असतो. तसेच वेदविद्येचा सुद्धा वेद पाठशालांमधून स्वामीजी शिक्षण देऊन प्रचार-प्रसार करीत आहेत. या सर्व कार्यासाठी 'धर्मश्री' प्रतिष्ठानतर्फे 'धर्मश्री' हे हिंदीतील मासिकही प्रकाशित होत असते. अशा या ''महानुभाव'' परमपूज्य स्वामी गोविंददेव गिरि महाराजांना आमचे त्रिवार वंदन !

अद्वैत प्रकाशनाच्या प्रकल्पांचे डीटीपी वगैरे करुन देणारे श्री. अविनाश कढे यांचे आम्ही आभारी आहोत. तसेच प्रत्येक सूचीची सीडी आकर्षक स्वरुपात सादर करून देणारे श्री. सुरेंद्र रानडे, श्री. मोघे आणि श्री. दीक्षित यांचेही आभार मानणे उचित ठरेल.

## ।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

**श्रीमद्‌भगवद्‌गीता – शब्द श्लोक सूची**

''ते हे मंत्ररहस्य गीता'' गीता शब्द-श्लोक सूचीला हे नामाभिधान कसे दिले त्याविषयी थोडेसे विवेचन करु यात – भगवद्‌गीतेची महती वर्णन करताना ज्ञानेश्वरीच्या १५व्या अध्यायात माउली म्हणतात ''साचचि बोलाचे नव्हे हे शास्त्र । पैं संसारु जिणते हे शस्त्र । आत्मा अवतरविते मंत्र । अक्षरे इयें ।।'' (ज्ञा. १५।५७६) म्हणजे, खरोखरीच गीता हे नुसते शब्दपांडित्याचे शास्त्र नाही. तर ही गीता संसार जिंकणारे शस्त्र आहे. या गीतेची ही अक्षरे आत्म्याला प्रकट करणारे मंत्र आहेत. आता, हे मंत्र म्हणजे गीतेतील ''सप्तशती''चे सातशे श्लोक ! या श्लोकांतील जे सर्व शब्द आहेत ते मंत्राचे कार्य करतात आणि ही गीता शब्द-श्लोक सूची आहे. माउलींनीच पुढे ''ते हे मंत्ररहस्य गीता । मेळवी जो माझिया भक्तां।। (ज्ञा. १८-१५१२) असे आश्वासित केले आहे. या मंत्रांचे म्हणजे या शब्दांचे रहस्य शब्द सूचीच्या माध्यमातून भक्तजनांना अद्वैत प्रकाशनाने उपलब्ध करुन दिलेले आहे. म्हणून, या प्रकल्पास ''ते हे मंत्ररहस्य गीता'' हे सार्थ नाव भगवतकृपेने दिले आहे.

माउली ज्ञानेश्वरांच्याच शब्दांत गीतेची महती वर्णन करणारी ओवी सांगून या प्रकाशकीय मनोगताचा समारोप करतो.

''तें अक्षरे नव्हती देखा । ब्रह्मसाम्राज्यदीपिका ।<br>
अर्जुनालागी चित्कळिका । उजळलिया श्रीकृष्णें ।। ज्ञा. (११।१७८)

व्यासपौर्णिमा<br>
३१.०७. २०१५

अद्वैत पब्लिकेशन्स्

## प्रकल्प

‘ऐसीं नानावर्णे रूपडीं’ –श्री ज्ञानेश्वरी – दृष्टांत सिद्धांत रूप चतुरंगातील पारायण प्रत
‘तो वाग्यज्ञु म्हणिजे’ – श्री ज्ञानेश्वरी – शब्द ओवी सूची
‘ते हे मंत्ररहस्य गीता’ –श्रीमद् भगवद्‌गीता – शब्द श्लोक सूची
‘हे गीतासागर तरंग’ – श्रीमद् भगवद्‌गीता पठण – दृक श्राव्य प्रकल्प
‘तुका झालासे कळस’ – श्री तुकाराम गाथा – शब्द अभंग सूची
‘हे शब्द रत्नांचे सागर’ – श्रीमद् दासबोध – शब्द ओवी सूची
‘शब्दब्रह्में होसी आकळा’ – श्री ज्ञानदेव गाथा – शब्द अभंग सूची
‘अनुभवामृतें येणें’ – अमृतानुभव – शब्द ओवी सूची
‘नाचू कीर्तनाचे रंगी’ – श्री नामदेव गाथा – शब्द अभंग सूची
‘श्रीकृष्णकीर्तीचे एकेक अक्षर’ – श्री एकनाथी भागवत – शब्द ओवी सूची
‘तयाचे बिसाट शब्द’ – श्री ज्ञानदेव हरिपाठ – शब्द अभंग सूची

# ।। अनुक्रमणिका (अक्षरवार शब्दसंख्या) ।।

| भाग | अक्षर | शब्दक्रमांक | शब्दसंख्या | भाग | अक्षर | शब्दक्रमांक | शब्दसंख्या | भाग | अक्षर | शब्दक्रमांक | शब्दसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १ | २२११ | ११ | द | ४१२९ | २६६ | २१ | ल | ७२७७ | ७२ |
| २ | क | २२१२ | ४९७ | १२ | ध | ४३९५ | ९१ | २२ | व | ७३४९ | ४३० |
| ३ | ख | २७०९ | २ | १३ | न | ४४८६ | ४६८ | २३ | श | ७७७९ | २३५ |
| ४ | ग | २७११ | १२० | १४ | प | ४९५४ | ६८४ | २४ | ष | ८०१४ | २ |
| ५ | घ | २८३१ | ७ | १५ | फ | ५६३८ | १७ | २५ | स | ८०१६ | ८२२ |
| ६ | च | २८३८ | ४४५ | १६ | ब | ५६५५ | १६३ | २६ | ह | ८८३८ | १४४ |
| ७ | छ | ३२८३ | १२ | १७ | भ | ५८१८ | २७३ | २७ | क्ष | ८९८२ | ३५ |
| ८ | ज | ३२९५ | १२४ | १८ | म | ६०९१ | ५५१ | २८ | ज्ञ | ९०१७ | ९१ |
| ९ | झ | ३४१९ | १ | १९ | य | ६६४२ | ५३६ | | | एकुण | ९१०७ |
| १० | त | ३४२० | ७०९ | २० | र | ७१७८ | ९९ | | | | |

# ।। ते हे मंत्ररहस्य गीता ।।

## ।। श्रीमद्भगवद्गीता - शब्द श्लोक सूची - निवडक शब्द ।।

**१. कर्म**
**२. भक्ति**
**३. मन**
**४. यज्ञ**
**५. योग**
**६. वेद**
**७. ज्ञान**

| | | | |
|---|---|---|---|
| २२८० | कर्म | भ.गी.०२.४९ | दूरेण हि अवरम् कर्म । बुद्धियोगात् धनञ्जय । बुद्धौ शरणम् अन्विच्छ । कृपणाः फलहेतवः |
| २२८१ | कर्म | भ.गी.०३.०५ | न हि कश्चित् क्षणम् अपि । जातु तिष्ठति अकर्मकृत् । कार्यते हि अवशः कर्म । सर्वः प्रकृतिजैः गुणैः |
| २२८२ | कर्म | भ.गी.०३.०८ | नियतम् कुरु कर्म त्वम् । कर्म ज्यायः हि अकर्मणः । शरीरयात्रा अपि च ते । न प्रसिद्ध्येत् अकर्मणः |
| २२८३ | कर्म | भ.गी.०३.०८ | नियतम् कुरु कर्म त्वम् । कर्म ज्यायः हि अकर्मणः । शरीरयात्रा अपि च ते । न प्रसिद्ध्येत् अकर्मणः |
| २२८४ | कर्म | भ.गी.०३.०९ | यज्ञार्थात् कर्मणः अन्यत्र । लोकः अयम् कर्मबन्धनः । तदर्थम् कर्म कौन्तेय । मुक्तसङ्गः समाचर |
| २२८५ | कर्म | भ.गी.०३.१५ | कर्म ब्रह्मोद्भवम् विद्धि । ब्रह्म अक्षरसमुद्भवम् । तस्मात् सर्वगतम् ब्रह्म । नित्यम् यज्ञे प्रतिष्ठितम् |
| २२८६ | कर्म | भ.गी.०३.१९ | तस्मात् असक्तः सततम् । कार्यम् कर्म समाचर । असक्तः हि आचरन् कर्म । परम् आप्नोति पूरुषः |
| २२८७ | कर्म | भ.गी.०३.१९ | तस्मात् असक्तः सततम् । कार्यम् कर्म समाचर । असक्तः हि आचरन् कर्म । परम् आप्नोति पूरुषः |
| २२८८ | कर्म | भ.गी.०३.२४ | उत्सीदेयुः इमे लोकाः । न कुर्याम् कर्म चेत् अहम् । सङ्करस्य च कर्ता स्याम् । उपहन्याम् इमाः प्रजाः |
| २२८९ | कर्म | भ.गी.०४.०९ | जन्म कर्म च मे दिव्यम् । एवम् यः वेत्ति तत्त्वतः । त्यक्त्वा देहम् पुनः जन्म । न एति माम् एति सः अर्जुन |
| २२९० | कर्म | भ.गी.०४.१५ | एवम् ज्ञात्वा कृतम् कर्म । पूर्वैः अपि मुमुक्षुभिः । कुरु कर्म एव तस्मात् त्वम् । पूर्वैः पूर्वतरम् कृतम् |
| २२९१ | कर्म | भ.गी.०४.१५ | एवम् ज्ञात्वा कृतम् कर्म । पूर्वैः अपि मुमुक्षुभिः । कुरु कर्म एव तस्मात् त्वम् । पूर्वैः पूर्वतरम् कृतम् |
| २२९२ | कर्म | भ.गी.०४.१६ | किम् कर्म किम् अकर्म इति । कवयः अपि अत्र मोहिताः । तत् ते कर्म प्रवक्ष्यामि । यत् ज्ञात्वा मोक्ष्यसे अशुभात् |
| २२९३ | कर्म | भ.गी.०४.१६ | किम् कर्म किम् अकर्म इति । कवयः अपि अत्र मोहिताः । तत् ते कर्म प्रवक्ष्यामि । यत् ज्ञात्वा मोक्ष्यसे अशुभात् |
| २२९४ | कर्म | भ.गी.०४.१८ | कर्मणि अकर्म यः पश्येत् । अकर्मणि च कर्म यः । सः बुद्धिमान् मनुष्येषु । सः युक्तः कृत्स्नकर्मकृत् |
| २२९५ | कर्म | भ.गी.०४.२१ | निराशीः यतचित्तात्मा । त्यक्तसर्वपरिग्रहः । शारीरम् केवलम् कर्म । कुर्वन् न आप्नोति किल्बिषम् |
| २२९६ | कर्म | भ.गी.०४.२३ | गतसङ्गस्य मुक्तस्य । ज्ञानावस्थितचेतसः । यज्ञाय आचरतः कर्म । समग्रम् प्रविलीयते |
| २२९७ | कर्म | भ.गी.०४.३३ | श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञात् । ज्ञानयज्ञः परन्तप । सर्वम् कर्म अखिलम् पार्थ । ज्ञाने परिसमाप्यते |
| २२९८ | कर्म | भ.गी.०५.११ | कायेन मनसा बुद्ध्या । केवलैः इन्द्रियैः अपि । योगिनः कर्म कुर्वन्ति । सङ्गम् त्यक्त्वा आत्मशुद्धये |
| २२९९ | कर्म | भ.गी.०६.०१ | श्रीभगवान् उवाच । अनाश्रितः कर्मफलम् । कार्यम् कर्म करोति यः । सः सन्न्यासी च योगी च । न निरग्निः न च अक्रियः |

| | | | |
|---|---|---|---|
| २३०० | कर्म | भ.गी.०६.०३ | आरुरुक्षो: मुने: योगम् । कर्म कारणम् उच्यते । योगारूढस्य तस्य एव । शम: कारणम् उच्यते |
| २३०१ | कर्म | भ.गी.०७.२९ | जरामरणमोक्षाय । माम् आश्रित्य यतन्ति ये । ते ब्रह्म तत् विदु: कृत्स्नम् । अध्यात्मम् कर्म च अखिलम् |
| २३०२ | कर्म | भ.गी.०८.०१ | अर्जुन उवाच । किम् तत् ब्रह्म किम् अध्यात्मम् । किम् कर्म पुरुषोत्तम । अधिभूतम् च किम् प्रोक्तम् । अधिदैवम् किम् उच्यते |
| २३०३ | कर्म | भ.गी.१६.२४ | तस्मात् शास्त्रम् प्रमाणम् ते । कार्याकार्यव्यवस्थितौ । ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तम् । कर्म कर्तुम् इह अर्हसि |
| २३०४ | कर्म | भ.गी.१७.२७ | यज्ञे तपसि दाने च । स्थिति: सत् इति च उच्यते । कर्म च एव तदर्थीयम् । सत् इति एव अभिधीयते |
| २३०५ | कर्म | भ.गी.१८.०३ | त्याज्यम् दोषवत् इति एके । कर्म प्राहु: मनीषिण: । यज्ञदानतप:कर्म । न त्याज्यम् इति च अपरे |
| २३०६ | कर्म | भ.गी.१८.०८ | दु:खम् इति एव यत् कर्म । कायक्लेशभयात् त्यजेत् । स: कृत्वा राजसम् त्यागम् । न एव त्यागफलम् लभेत् |
| २३०७ | कर्म | भ.गी.१८.०९ | कार्यम् इति एव यत् कर्म । नियतम् क्रियते अर्जुन । सङ्गम् त्यक्त्वा फलम् च एव । स: त्याग: सात्त्विक: मत: |
| २३०८ | कर्म | भ.गी.१८.१० | न द्वेष्टि अकुशलम् कर्म । कुशले न अनुषज्जते । त्यागी सत्त्वसमाविष्ट: । मेधावी छिन्नसंशय: |
| २३०९ | कर्म | भ.गी.१८.१५ | शरीरवाङ्मनोभि: यत् । कर्म प्रारभते नर: । न्याय्यम् वा विपरीतम् वा । पञ्च एते तस्य हेतव: |
| २३१० | कर्म | भ.गी.१८.१८ | ज्ञानम् ज्ञेयम् परिज्ञाता । त्रिविधा कर्मचोदना । करणम् कर्म कर्ता इति । त्रिविध: कर्मसङ्ग्रह: |
| २३११ | कर्म | भ.गी.१८.१९ | ज्ञानम् कर्म च कर्ता च । त्रिधा एव गुणभेदत: । प्रोच्यते गुणसङ्ख्याने । यथावत् शृणु तानि अपि |
| २३१२ | कर्म | भ.गी.१८.२३ | नियतम् सङ्गरहितम् । अरागद्वेषत: कृतम् । अफलप्रेप्सुना कर्म । यत् तत् सात्त्विकम् उच्यते |
| २३१३ | कर्म | भ.गी.१८.२४ | यत् तु कामेप्सुना कर्म । साहङ्कारेण वा पुन: । क्रियते बहुलायासम् । तत् राजसम् उदाहृतम् |
| २३१४ | कर्म | भ.गी.१८.२५ | अनुबन्धम् क्षयम् हिंसाम् । अनवेक्ष्य च पौरुषम् । मोहात् आरभ्यते कर्म । यत् तत् तामसम् उच्यते |
| २३१५ | कर्म | भ.गी.१८.४३ | शौर्यम् तेज: धृति: दाक्ष्यम् । युद्धे च अपि अपलायनम् । दानम् ईश्वरभाव: च । क्षात्रम् कर्म स्वभावजम् |
| २३१६ | कर्म | भ.गी.१८.४४ | कृषिगौरक्ष्यवाणिज्यम् । वैश्यकर्म स्वभावजम् । परिचर्यात्मकम् कर्म । शूद्रस्य अपि स्वभावजम् |
| २३१७ | कर्म | भ.गी.१८.४७ | श्रेयान् स्वधर्म: विगुण: । परधर्मात् स्वनुष्ठितात् । स्वभावनियतम् कर्म । कुर्वन् न आप्नोति किल्बिषम् |
| २३१८ | कर्म | भ.गी.१८.४८ | सहजम् कर्म कौन्तेय । सदोषम् अपि न त्यजेत् । सर्वारम्भा: हि दोषेण । धूमेन अग्नि: इव आवृता: |
| २३१९ | कर्मचोदना | भ.गी.१८.१८ | ज्ञानम् ज्ञेयम् परिज्ञाता । त्रिविधा कर्मचोदना । करणम् कर्म कर्ता इति । त्रिविध: कर्मसङ्ग्रह: |

| | | | |
|---|---|---|---|
| २३२० | कर्मजम् | भ.गी.०२.५१ | कर्मजम् बुद्धियुक्ता: हि । फलम् त्यक्त्वा मनीषिण: । जन्मबन्धविनिर्मुक्ता: । पदम् गच्छन्ति अनामयम् |
| २३२१ | कर्मजा | भ.गी.०४.१२ | काङ्क्षत: कर्मणाम् सिद्धिम् । यजन्ते इह देवता: । क्षिप्रम् हि मानुषे लोके । सिद्धि: भवति कर्मजा |
| २३२२ | कर्मजान् | भ.गी.०४.३२ | एवम् बहुविधा: यज्ञा: । वितता: ब्रह्मण: मुखे । कर्मजान् विद्धि तान् सर्वान् । एवम् ज्ञात्वा विमोक्ष्यसे |
| २३२३ | कर्मण: | भ.गी.०३.०१ | अर्जुन उवाच । ज्यायसी चेत् कर्मण: ते । मता बुद्धि: जनार्दन । तत् किम् कर्मणि घोरे माम् । नियोजयसि केशव |
| २३२४ | कर्मण: | भ.गी.०३.०९ | यज्ञार्थात् कर्मण: अन्यत्र । लोक: अयम् कर्मबन्धन: । तदर्थम् कर्म कौन्तेय । मुक्तसङ्ग: समाचर |
| २३२५ | कर्मण: | भ.गी.०४.१७ | कर्मण: हि अपि बोद्धव्यम् । बोद्धव्यम् च विकर्मण: । अकर्मण: च बोद्धव्यम् । गहना कर्मण: गति: |
| २३२६ | कर्मण: | भ.गी.०४.१७ | कर्मण: हि अपि बोद्धव्यम् । बोद्धव्यम् च विकर्मण: । अकर्मण: च बोद्धव्यम् । गहना कर्मण: गति: |
| २३२७ | कर्मण: | भ.गी.१४.१६ | कर्मण: सुकृतस्य आहु: । सात्त्विकम् निर्मलम् फलम् । रजस: तु फलम् दु:खम् । अज्ञानम् तमस: फलम् |
| २३२८ | कर्मण: | भ.गी.१८.०७ | नियतस्य तु सन्न्यास: । कर्मण: न उपपद्यते । मोहात् तस्य परित्याग: । तामस: परिकीर्तित: |
| २३२९ | कर्मण: | भ.गी.१८.१२ | अनिष्टम् इष्टम् मिश्रम् च । त्रिविधम् कर्मण: फलम् । भवति अत्यागिनाम् प्रेत्य । न तु सन्न्यासिनाम् क्वचित् |
| २३३० | कर्मणा | भ.गी.०३.२० | कर्मणा एव हि संसिद्धिम् । आस्थिता: जनकादय: । लोकसङ्ग्रहम् एव अपि । सम्पश्यन् कर्तुम् अर्हसि |
| २३३१ | कर्मणा | भ.गी.१८.६० | स्वभावजेन कौन्तेय । निबद्ध: स्वेन कर्मणा । कर्तुम् न इच्छसि यत् मोहात् । करिष्यसि अवश: अपि तत् |
| २३३२ | कर्मणाम् | भ.गी.०३.०४ | न कर्मणाम् अनारम्भात् । नैष्कर्म्यम् पुरुष: अश्नुते । न च सन्न्यसनात् एव । सिद्धिम् समधिगच्छति |
| २३३३ | कर्मणाम् | भ.गी.०४.१२ | काङ्क्षत: कर्मणाम् सिद्धिम् । यजन्ते इह देवता: । क्षिप्रम् हि मानुषे लोके । सिद्धि: भवति कर्मजा |
| २३३४ | कर्मणाम् | भ.गी.०५.०१ | अर्जुन उवाच । सन्न्यासम् कर्मणाम् कृष्ण । पुन: योगम् च शंससि । यत् श्रेय: एतयो: एकम् । तत् मे ब्रूहि सुनिश्चितम् |
| २३३५ | कर्मणाम् | भ.गी.१४.१२ | लोभ: प्रवृत्ति: आरम्भ: । कर्मणाम् अशम: स्पृहा । रजसि एतानि जायन्ते । विवृद्धे भरतर्षभ |
| २३३६ | कर्मणाम् | भ.गी.१८.०२ | श्रीभगवान् उवाच । काम्यानाम् कर्मणाम् न्यासम् । सन्न्यासम् कवय: विदु: । सर्वकर्मफलत्यागम् । प्राहु: त्यागम् विचक्षणा: |
| २३३७ | कर्मणि | भ.गी.०२.४७ | कर्मणि एव अधिकार: ते । मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतु: भू: । मा ते सङ्ग: अस्तु अकर्मणि |
| २३३८ | कर्मणि | भ.गी.०३.०१ | अर्जुन उवाच । ज्यायसी चेत् कर्मण: ते । मता बुद्धि: जनार्दन । तत् किम् कर्मणि घोरे माम् । नियोजयसि केशव |
| २३३९ | कर्मणि | भ.गी.०३.२२ | न मे पार्थ अस्ति कर्तव्यम् । त्रिषु लोकेषु किञ्चन । न अनवाप्तम् अवाप्तव्यम् । वर्ते एव च कर्मणि |

| | | | |
|---|---|---|---|
| २३४० | कर्मणि | भ.गी.०३.२३ | यदि हि अहम् न वर्तेयम् । जातु कर्मणि अतन्द्रित: । मम वर्त्म अनुवर्तन्ते । मनुष्या: पार्थ सर्वश: |
| २३४१ | कर्मणि | भ.गी.०३.२५ | सक्ता: कर्मणि अविद्वांस: । यथा कुर्वन्ति भारत । कुर्यात् विद्वान् तथा असक्त: । चिकीर्षु: लोकसङ्ग्रहम् |
| २३४२ | कर्मणि | भ.गी.०४.१८ | कर्मणि अकर्म य: पश्येत् । अकर्मणि च कर्म य: । स: बुद्धिमान् मनुष्येषु । स: युक्त: कृत्स्नकर्मकृत् |
| २३४३ | कर्मणि | भ.गी.०४.२० | त्यक्त्वा कर्मफलासङ्गम् । नित्यतृप्त: निराश्रय: । कर्मणि अभिप्रवृत्त: अपि । न एव किञ्चित् करोति स: |
| २३४४ | कर्मणि | भ.गी.१४.०९ | सत्त्वम् सुखे सञ्जयति । रज: कर्मणि भारत । ज्ञानम् आवृत्य तु तम: । प्रमादे सञ्जयति उत |
| २३४५ | कर्मणि | भ.गी.१७.२६ | सद्भावे साधुभावे च । सत् इति एतत् प्रयुज्यते । प्रशस्ते कर्मणि तथा । सत् शब्द: पार्थ युज्यते |
| २३४६ | कर्मणि | भ.गी.१८.४५ | स्वे स्वे कर्मणि अभिरत: । संसिद्धिम् लभते नर: । स्वकर्मनिरत: सिद्धिम् । यथा विन्दति तत् शृणु |
| २३४७ | कर्मफलत्याग: | भ.गी.१२.१२ | श्रेय: हि ज्ञानम् अभ्यासात् । ज्ञानात् ध्यानम् विशिष्यते । ध्यानात् कर्मफलत्याग: । त्यागात् शान्ति: अनन्तरम् |
| २३४८ | कर्मफलत्यागी | भ.गी.१८.११ | न हि देहभृता शक्यम् । त्यक्तुम् कर्माणि अशेषत: । य: तु कर्मफलत्यागी । स: त्यागी इति अभिधीयते |
| २३४९ | कर्मफलप्रेप्सु: | भ.गी.१८.२७ | रागी कर्मफलप्रेप्सु: । लुब्ध: हिंसात्मक: अशुचि: । हर्षशोकान्वित: कर्ता । राजस: परिकीर्तित: |
| २३५० | कर्मफलम् | भ.गी.०५.१२ | युक्त: कर्मफलम् त्यक्त्वा । शान्तिम् आप्नोति नैष्ठिकीम् । अयुक्त: कामकारेण । फले सक्त: निबध्यते |
| २३५१ | कर्मफलम् | भ.गी.०६.०१ | श्रीभगवान् उवाच । अनाश्रित: कर्मफलम् । कार्यम् कर्म करोति य: । स: सन्न्यासी च योगी च । न निरग्नि: न च अक्रिय: |
| २३५२ | कर्मफलसंयोगम् | भ.गी.०५.१४ | न कर्तृत्वम् न कर्माणि । लोकस्य सृजति प्रभु: । न कर्मफलसंयोगम् । स्वभाव: तु प्रवर्तते |
| २३५३ | कर्मफलहेतु: | भ.गी.०२.४७ | कर्मणि एव अधिकार: ते । मा फलेषु कदाचन । मा कर्मफलहेतु: भू: । मा ते सङ्ग: अस्तु अकर्मणि |
| २३५४ | कर्मफलासङ्गम् | भ.गी.०४.२० | त्यक्त्वा कर्मफलासङ्गम् । नित्यतृप्त: निराश्रय: । कर्मणि अभिप्रवृत्त: अपि । न एव किञ्चित् करोति स: |
| २३५५ | कर्मफले | भ.गी.०४.१४ | न माम् कर्माणि लिम्पन्ति । न मे कर्मफले स्पृहा । इति माम् य: अभिजानाति । कर्मभि: न स: बध्यते |
| २३५६ | कर्मबन्धन: | भ.गी.०३.०९ | यज्ञार्थात् कर्मण: अन्यत्र । लोक: अयम् कर्मबन्धन: । तदर्थम् कर्म कौन्तेय । मुक्तसङ्ग: समाचर |
